पी.डब्लु.डी.व्ही.ए.क्र.७०/२०२४
रश्मी वि. हरिष

MHWR060029242024

## निशाणी क्र. १५ वर आदेश

प्रस्तुतचा अर्ज अर्जदारने अंतरिम पोटगी मिळण्याकरीता कलम २३ घरगुती हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ प्रमाणे दाखल केला आहे.

२. अर्जदार हिने असे कथन केले आहे की, गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदार हिचा पती असून गैरअर्जदार यांनी अर्जदार हिचा शारिरीक, मानसिक व आर्थिक छळ केलेला आहे. अर्जदार व तिच्या मुलीची ते कोणतीही जबाबदारी स्वीकारत नाही. तसेच त्याने अर्जदार व तिच्या मुलीच्या पालनपोषणाची कुठलीही जबाबदारी स्वीकारलेली नाही. त्यामुळे तिला माहेरी राहावे लागत आहे.

३. अर्जदार हिने पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार हिच्याकडे कुठलेही उत्पन्नाचे साधन नसून ती तिच्या व तिच्या मुलीच्या उदरनिर्वाहाकारीता तिच्या आई वडिलांवर अवलंबून आहे. गैरअर्जदार क्र. १ हा इलेक्ट्रीशीयन प्लंबर व बोर वरचे काम करीत असून त्यापासून त्याला दरमहा सत्तर ते ऐंशी हजार रूपये मिळतात. त्यामूळे ते अर्जदाराला रूपये २५,०००/- दरमहा पोटगी म्हणून देवू शकतात. म्हणून अर्जदाराने अंतरिम पोटगीचा अर्ज मंजूर व्हावा अशी विनंती केली आहे.

४. गैरअर्जदार यांनी त्यांचा जबाब नि.क्र. १३ वर दाखल केला आहे. त्यांनी अर्जदारासोबतचे नातेसंबंध मान्य केले असून इतर आरोप नाकारले आहे. पुढे त्यांनी असे कथन केले आहे की त्यांनी अर्जदार क्र. १ हिला कोणत्याही प्रकारे त्रास दिलेला नाही.

तसेच त्यांनी अर्जदार यांच्यावरच आरोपी केले आहे. गैरअर्जदार क्र. १ हा कुठलेही काम करीत नसून तो अर्जदार क्र. १ ने दिलेल्या मानसिक त्रासामुळे भटकलेल्या स्वरूपात राहतो आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

५. दोन्ही विधिज्ञांचे युक्तीवाद ऐकले. तसेच दोन्ही सन्माननीय विधिज्ञांनी त्यांचा युक्तीवाद हा अर्जातील कथने व लेखी जबाबातील कथने यानुसार केला.

६. सदर अर्ज निकाली काढणेकरीता खालील मुद्दे निघतात, त्यांची कारणमिमांसा निष्कर्ष पुढिलप्रमाणे–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ याच्याकडून अंतरिम पोटगी मिळणेकरीता पात्र आहे का ? | ...अंशतः होय. |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

मुद्दे क्र.१ व २ करीता

७. अर्जदारने मुख्यतः गैरअर्जदार व त्यांच्या कुटुंबियांवर शारिरीक व मानसिक छळ केल्याचा आरोप केला. त्याचप्रमाणे तिने इतरही आरोप गैरअर्जदार यांच्यावर केले आहेत. अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदार क्र.१ ची पत्नी असून अर्जदार ही सध्या माहेरी राहत आहे. त्यामुळे अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांच्यामध्ये वाद विवाद आहेत ही बाब स्पष्ट होते. गैरअर्जदार यांनी अर्जदार हिचा खरोखरच शारिरीक व मानसिक छळ केला किंवा नाही ही बाब पुराव्यानंतरच स्पष्ट होईल. परंतु सध्या स्थितीत अर्जदार व गैरअर्जदार यांचे ताणलेले संबंध बघता अर्जदार ही अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे.

८.	अर्जदार हिने गैरअर्जदार यांच्या उत्पन्नाबाबत अभिलेखावर कुठलाही दस्त दाखल केलेला नाही. तसेच गैरअर्जदार यांनी सुध्दा अर्जदाराच्या उत्पन्नाबाबत कोणतेही दस्त दाखल केलेले नाही. अर्जदार हिची पालनपोषणाची जबाबदारी गैरअर्जदार क्र.१ वर आहे. गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदार हिला पोटगी देण्यास बंधनकारक आहे. परंतु अभिलेखावर प्रथमदर्शनी उपलब्ध असलेला पूरावा लक्षात घेता मी खालील आदेश पारीत करतो.

## <u>आदेश</u>

**१.** अर्जदारचा अंतरिम खावटी अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**२.** गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार हिस दरमहा रू.१,५००/– अंतरिम पोटगी तसेच अर्जदार क्र. २ यास रू. १,०००/– आदेश तारखेपासून द्यावे.

AMOL B INGOLE Digitally signed by AMOL B INGOLE Date: 2026.01.06 14:56:35 +0530

**(अ. भा. इंगोले)**

दिनांक :– ०५/०१/२०२६.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२), हिंगणघाट

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | B. S. Wani. |
| Court | : | $2^{nd}$ Jt. CJJD & JMFC, Hinganghat. |
| Order Date | : | 05/01/2026. |
| Order signed by the Presiding Officer on | : | 05/01/2026. |
| Order uploaded on | : | 06/01/2026. |